देशोन्नती

# आवादा फाऊंडेशनतर्फे शिरधाने प्र. नेर गावासाठी अत्याधुनिक रूग्णवाहिका प्रदान



देशोन्नती वृत्तसंकलन दिलीप साळुंखे

नेर : धुळे तालुक्यातील शिरधाने (प्र. नेर), दि. १२ जून २०२६ : ग्रामीण भागातील नागरिकांना वेळेवर आणि दर्जेदार आपत्कालीन आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने अवादा फाउंडेशनने शिरधाने (प्र. नेर) गावाला अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज रुग्णवाहिका प्रदान केली आहे.

गावात आयोजित विशेष कार्यक्रमात या रुग्णवाहिकेचे लोकार्पण करण्यात आले. या उपक्रमामुळे शिरधाने (प्र. नेर) तसेच परिसरातील नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत तातडीची वैद्यकीय मदत मिळण्यास मोठा दिलासा मिळणार आहे. अवादा फाउंडेशनतर्फे उपलब्ध करून देण्यात आलेली ही रुग्णवाहिका 'बेसिक लाईफ सपोर्ट सिस्टिम'ने सुसज्ज असून तिचे संपूर्ण संचालन आणि देखभाल फाउंडेशनमार्फत करण्यात येणार आहे.

गाव व परिसरातील नागरिकांसाठी विशेष आपत्कालीन संपर्क क्रमांक उपलब्ध करून देण्यात आला असून, त्या क्रमांकावर संपर्क साधताच ही रुग्णवाहिका चोवीस तास सेवेसाठी तत्पर राहणार आहे. रुग्णवाहिकेची वैशिष्ट्ये आणि उपयुक्तता आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना प्राथमिक उपचार देणे, त्यांची प्रकृती स्थिर ठेवणे तसेच सुरक्षितपणे जवळच्या रुग्णालयात पोहोचविणे यासाठी ही रुग्णवाहिका पूर्णतः सक्षम आहे. या रुग्णवाहिकेत पुरेशा क्षमतेचे ऑक्सिजन सिलिंडर, प्रौढ व बालरुग्णांसाठी स्वतंत्र ऑक्सिजन मास्क, प्राथमिक उपचार साहित्य तसेच अग्निशामक यंत्राची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या लोकार्पण सोहळ्यास उपविभागीय अधिकारी रोहन कुंवर, तहसीलदार अरुण शेवाळे, पोलीस निरीक्षक धनंजय पाटील, पोलीस पाटील मदन कांतीलाल भदाणे तसेच शिरधाने (प्र. नेर) गावचे सरपंच, ग्रामपंचायत पदाधिकारी, विविध क्षेत्रातील मान्यवर आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. मान्यवरांनी अवादा फाउंडेशनच्या या समाजोपयोगी उपक्रमाचे कौतुक करत ग्रामीण भागासाठी हा उपक्रम अत्यंत उपयुक्त आणि गरजेचा असल्याचे मत व्यक्त केले. शिरधाने (प्र. नेर)च्या सर्वांगीण विकासासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न अवादा फाउंडेशन केवळ आरोग्य क्षेत्रापुरते मर्यादित न राहता शिक्षण, उपजीविका आणि क्रीडा क्षेत्रातही उल्लेखनीय कार्य करीत आहे. फाउंडेशनमार्फत विद्यार्थ्यांना शालेय दप्तर व सायकलींचे वाटप, मोफत कोचिंग सेंटर, संगणक शिक्षण आणि व्हर्च्युअल लर्निंग सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तसेच खेळाडूंना क्रीडा साहित्य, महिलांसाठी मोफत शिवणकला प्रशिक्षण केंद्र आणि अत्यंत गरजू ३० कुटुंबांना दरमहा मोफत धान्य व वैद्यकीय सहाय्य पुरविण्यात येत आहे.